## <u>ठळक बातम्या</u>

- छत्तीसगडमधे सुरक्षादलासोबतच्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार, दोन जवानांना वीरमरण
- आनंदवन प्रकल्पाला दहा कोटी रुपयांचा कॉर्पस फंड देण्याची मुख्यमंत्री फडनवीस यांची घोषणा
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी साधणार संवाद
- कटक इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडचं भारतापुढं विजयासाठी ३०५ धावांचं आव्हान

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत तेजस शिरसेची सुवर्णपदकाला गवसली

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षादलं आणि नक्षलवाद्यांमधे झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले, तर सुरक्षा दलांचे दोन जवान शहीद झाले. इतर दोन जवान जखमी असून झाले त्यांची प्रकृती स्थिर आहे.

बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात आज सकाळी सुरक्षा दलाचे ६५० जवानांच्या पथकांनी शोधमोहिम सुरू केली. त्यावेळी

नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला प्रत्युत्तर दिलं.

या चकमकीत ठार झालेल्या ३१ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. ज्या ठिकाणी चकमक झाली तिथून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त केल्याचं बस्तर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी यांनी सांगितलं. या चकमकीत शहीद झालेल्यांपैकी एक कर्मचारी राज्य पोलीस दलाचा, तर दुसरा विशेष कृती दलाचा जवान होता.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर इथं सुरक्षादलांनी नक्षलवाद्यांविरोधात केलेल्या कारवाईबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाधान व्यक्त केलं. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत देशातील नक्षलवाद संपवण्याचं उद्दिष्ट्य असल्याचा पुनरुच्चार अमित शहा यांनी आज समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये केला.

**<><><><><>**

बाबा आमटे यांनी सुरु केलेल्या आनंदवन प्रकल्पाला दहा कोटी रुपयांचा कॉर्पस फंड देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. वरोरा इथं आनंदवनात महारोगी सेवा समितीच्या पंचाहत्तर वर्षपूर्ती कृतज्ञता मित्र मेळाव्यात ते बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२७ पर्यंत देश कुष्ठरोगमुक्त करण्याचं ठरवलं आहे. आनंदवनसारख्या समाजसेवी संघटनांच्या मदतीनेच हे◌े साध्य करता येईल असं ते म्हणाले. आनंदवनात पाचशेजणांसाठी निवासी रुग्णकेंद्र उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

शासकीय अनुदानाच्या रकमेत २०१२ पासून कोणतीही वाढ झालेली नाही असं सांगत अनुदान वाढवल्याची घोषणाही त्यांनी केली.

उद्योग मंत्री उदय सामंतही यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्यावहिल्या कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्याची घोषणा यावेळी केली.

**<><><><><>**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सातत्य आणि सर्वसमावेशकता असून सुमारे एक कोटी मध्यमवर्गीय कुटुंबं करमुक्त झाली आहेत, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. या करबचतीमधून जनतेच्या हातात एक लाख कोटी रुपये येतील, हेच पैसे गुंतवणूक आणि व्यवहारात येऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असं ते म्हणाले. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी आणि पर्यटन उद्योगासाठी भरीव तरतूद केल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सहकार चळवळीतल्या संस्था नैतिक मूल्यांच्या आधारावर पारदर्शकपणे चालवल्या तर सहकार क्षेत्राची निश्चितच भरभराट होईल, असं मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केलं आहे. ते आज अहिल्यानगर इथं 'आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५' च्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन आणि राज्य

सरकारचा सहकार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचं आयोजन केलं आहे.

जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पतसंस्था चळवळीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे. हा कार्यक्रम परीक्षेतील तणावमुक्त अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणारा तसंच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा महत्वपूर्ण उपक्रम असल्याची प्रतिक्रिया बीड इथले शिक्षक कृष्णा जाधव आणि विद्यार्थ्याने व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांशी आर्थिक, तंत्रज्ञानात्मक आणि धोरणात्मक भागीदारी दृढ करणं हा या दौऱ्याचा हेतू आहे. १० ते १२ फेब्रुवारी रोजी ते फ्रान्समधे कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेत उपस्थित राहतील, तसंच अनेक द्विपक्षीय चर्चांमधे सहभागी होतील. मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही काही लोकांची किंवा कंपन्यांची मक्तेदारी बनू नये याची भारताला चिंता आहे, असं भारताचे फ्रान्समधले राजदूत संजीव कुमार सिंगला म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता सुरक्षित, सर्वसमावेशी असणं आवश्यक आहे असं ते म्हणाले.

फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही आठवड्यातच प्रधानमंत्री या देशाला भेट देत असल्यानं, त्यांचा अमेरिका दौराही फ्रान्सइतकाच महत्त्वाचा मानला जात आहे.

**<><><><><>**

कटक इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडनं भारतापुढं विजयासाठी ३०५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

इंग्लंडनं  नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सामन्यातला शेवटचा चेंडू बाकी असताना त्यांचा डाव संपला. मात्र त्यांनी ३०४ धावा केल्या. फिल्सोल्ट आणि बे◌ेन डकेट यांनी पहिल्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली.

ज्यो रुटनं ६९, तर बे◌ेन डकेटनं ६५, धावा केल्या. लियाम लिविंगस्टोननं ४१, तर हॅरी ग्रोथनं ३१ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे रविंद्र जडेजानं ३ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १० षटकात बिनबाद ७७ धावा झाल्या होत्या. रोहित शर्मानं अर्धशतक केलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या तेजस शिरसे यानं पुरुषांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत आणि आंध्र प्रदेशच्या ज्योती याराजी हिनं महिलांच्या ११० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावलं आहे. या दोघांनी २०२२ आणि २०२३मध्येही राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

या स्पर्धेमधे महाराष्ट्राने सर्वाधिक ११३ पदकं जिंकली असून त्यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून ४२ सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२५ साठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत येत्या १८ फेब्रुवारीपर्यंत वाढवली आहे. याशिवाय, अर्जात काही बदल असल्यास त्यात दुरुस्ती करण्याची मुदत १९ ते २५ फेब्रुवारी पर्यंत असणार आहे.

यापूर्वी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची शेवटची तारीख ११ फेब्रुवारी होती. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे दरवर्षी नागरी सेवा परीक्षा, पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीन टप्प्यांत घेतली जाते.

<><><><><>

शिक्षण महर्षी मनोहर भाई पटेल यांच्या ११९ व्या जयंतीनिमित्त आज गोंदिया भंडारा जिल्ह्यातले गुणवंत विद्यार्थी, शेतकरी आणि पत्रकारांचा केंद्रीय मंत्री पीयुष गोयल आणि खासदार प्रफुल पटेल यांच्या हस्ते गोंदिया

इथं सत्कार करण्यात आला. मनोहर भाई पटेल यांनी आदिवासीबहुल भागात शिक्षणाचा निरंतर प्रसार केला. त्यांचं हे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचं पीयूष गोयल यावेळी म्हणाले.

<><><><><>

ठाण्यातल्या खोपट बसस्थानकावरच्या चालक वाहकांसाठीच्या वातानुकूलित विश्रांतीगृहाचं उद्घाटन आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. या विश्रांतीगृहाचं रोल मॉडेल राज्यभरात राबवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. एस्टी कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवा हीच इश्वर सेवा असं मानून काम करावं, असं सांगत शिंदे यांनी कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास शासन समर्थ आहे, अशी ग्वाही दिली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सामाजिक न्याय, महिला कल्याण, व्यापार, कृषी आणि न्याय व्यवस्थेसाठी केलेलं कार्य आजही देशवासियांसाठी प्रेरणादायी आहे, असं विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी म्हटलं आहे. अहिल्यानगर मध्ये चौंडी इथं अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त आयोजित अभिवादन समारंभात ते आज बोलत होते.

//<><><><><>//